89

ISSN 2277- 8063 (Print)
June-2020
Vol. IX / Issue.II / 2020
Impact Factor - 6.013

# Navjyot
नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal [ Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management]

*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

IIJIF iiJS Cosmos Scientific Journal Impact Factor TOGETHER WE REACH THE GOAL

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Head, Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication,Kolhapur.**

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ

10

I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
Navjyot / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

## CONTENT


| Sr.No. | Title | Author | P.No. |
|---|---|---|---|
| 1. | समेलनाध्यक्ष मनोगत - महाराष्ट्रातील नव – सामाजिक चळवळी | प्रा.बाबासाहेब फलके | 1-3 |
| | **नेहरूवादी सामजिक चळवळ** | | |
| 2. | जागतिकीकरणाचे धोरण व नेहरू विचारधारा | प्रा.डॉ.रविंद्र पांडुरंगभणगे | 4-7 |
| 3. | धर्मनिरपेक्ष चळवळ : काळाची गरज | प्रा.डॉ.लांडगे पीएस. | 8-10 |
| 4. | पंडीत जवाहरलाल नेहरूचे अलि प्ततावाद धोरण | प्रा.डॉ.मनोज साताप्पा जाधव | 11-13 |
| 5. | पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे राष्ट्र निर्मानातील योगदानाचा एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ.संभाजी संतोष पाटील | 14-21 |
| 6. | पं.नेहरूंची भारतीय परराष्ट्र धोरणातील भूमिका | डॉ.अरुण गाडे,<br>प्रा. विशाल कांबळे | 22-30 |
| 7. | अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता : एक अध्ययन | प्रा. अमोल भाऊराव बंड | 30-33 |
| 8. | पंडित नेहरू आणि राष्ट्र उभारणी | श्रेयश गुरुदास मोहिते | 34-41 |
| | **कोरोना संकट** | | |
| 9. | Convalescent Plasma Theory: A Ray of Hope for India | Meenal D. Patil,<br>Dipali N. Godase | 42-47 |
| 10. | कोरोना व चीनचे राजकारण | डॉ. अरुण चव्हाण | 48-52 |
| 11. | कोरोना आणि राजकीय व्यवस्थेच्या मर्यादा | प्रा.डॉ. आण्णासाहेब हारदारे | 53-55 |
| 12. | कोरोना संकट आणि भारत | प्रा.डॉ.प्रफुल्ल अ. राऊत | 56-58 |
| 13. | लहान शहरातील गर्दी नियंत्रणाचे उपाय: गडहिंग्लज नगरपालिका क्षेत्राचा एक अभ्यास | डॉ.अनिल डी.पाटील | 59-62 |
| 14. | कोरोना व लॉकडाऊनचा चिकित्सक अभ्यास | प्रा.बळवंतराव कुंडलीक जाधव | 63-67 |
| 15. | कोरोना साथीचे जागतिक परिणाम | प्रा. ए. बी.मोहिते | 68-71 |
| 16. | कोरोना महामारीनंतरचे जागतिक परिणाम व भारत | प्रा.एन .एल.गायकवाड | 72-73 |
| 17. | कोरोना महामारीचे भारतातील राजकीय परिणाम | प्रा.धर्मवीर शाहू क्षीरसागर | 74-78 |
| 18. | कोरोनाचे आंतरराष्ट्रीय राजकारणावरील झालेल्या परिणामाचे अध्ययन | भूपेंद्र किशोर बाणाईत | 79-83 |
| 19. | कोरोना संकट आणि भारत | सौरभ संजय पाटील | 84-87 |
| 20. | कोरोना संकट आणि भारतीय संतसाहित्याचा पर्याय | प्रा.सुजय बाबुराव पाटील | 88-90 |
| 21. | कोरोना संकट आणि भारत | प्रा. दत्तात्रय कर्दपवार | 91-94 |
| 22. | कोरोना संकट व भारत | प्रा.डॉ.संतोष शिवकुमार खत्री<br>संदीप जगन्नाथ वारुळे | 95-97 |
| 23. | कोरोना संकट व भारत | प्रा.संदीप शिवलिंग गाडे | 98-100 |
| 24. | कोरोना : एक जैविक अस्त्र | डॉ.संदीप तुंडूरवार | 101-108 |
| 25. | कोरोना संकट आणि जागतिक राजकारणाचे बदलते स्वरूप | प्रा.डॉ.विजय देठे | 109-111 |




ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# लहान शहरातील गर्दी नियंत्रणाचे उपाय: गडहिंग्लज नगरपालिका क्षेत्राचा एक अभ्यास

डॉ. अनिल डी. पाटील,

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज जि. कोल्हापूर फो. ९९७५५८६७१३

**प्रस्तावना:**

कोरोना अर्थात कोव्हीड १९ विषाणूंचा संसर्ग रोखणेसाठी आपण १७ मे २०२० अखेर लॉकडाउनचे तीन प्रयोग केले. त्याचा परीणाम म्हणून इतर देशांच्या तुलनेत विषाणूंच्या प्रसाराची गती खुपच कमी राहीली आहे. लॉकडाउन उठविल्यानंतर प्रशासनाने काय केले पाहीजे याचे चिंतन करणे आवश्यक आहे. व्यवहार पुन्हा सुरू केल्याशिवाय पर्यायच नाही. परंतु ते कसे केले असता आपण अधिक सुरक्षित राहु शकतो याची मांडणी या पेपरच्या माध्यमातून करण्यात आली आहे. पोस्ट लॉकडाउन अर्थात टाळेबंदी उठविल्यानंतर आपण कोणत्या पध्दतीने बंद व्यवहार पुन्हा सुरू केले पाहीजेत याची मांडणी एका प्रारूपाद्वारे करण्याचा प्रयत्न या अभ्यासात केला गेला आहे.

**उद्देश:**

मोठे उद्योग, वाहतुक व दळण वळण, उत्पादक, व्यापारी, दुकानदार, छोटे विक्रेते, व्यवसायीक, यांचे व्यवहार पुन्हा सुरू करताना पुन्हा टाळेबंदीचा प्रश्न निर्माण होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. ती कशा प्रकारे घेता येउ शकेल हे सूचविणे हा या पेपरचा उद्देश आहे. एखादा गाफीलपणा नागरीक, प्रशासन व समाज यांना किती त्रासदायक होउ शकतो याचा अंदाज आपणास आला आहे.

**गृहीतक:**

हे प्रारूप दोन महत्वाच्या गृहीतकांवर आधारीत आहे. आर्थिक, शारीरीक, सामाजिक, मानसिक कारणासाठी टाळेबंदी उठविल्यानंतर मोठया प्रमाणात लोक बाजारात येणार. कारण, समाजातील कांही वर्ग उपरोक्त कारणांमुळे जास्त काळ घरात बसु शकत नाहीत. दुसरे गृहीतक हे की, कोरोना विरूध्दची लढाई ही दिर्घकाळ लढावी लागणार आहे परंतु, पोलिस, आरोग्य, आणि सामान्य प्रशासनाला लोकांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यावर मर्यादा आहेत. त्यामुळे स्वयंशिस्तीला पर्याय नाही.

**समस्या :**

कोरोनाची समस्या अत्यंत गंभीर, आर्थिक व सामाजिक दृष्टया गुंतागुंतीची, व्यापक व दिर्घकालीन आहे हे सांगण्यासाठी आता कोणा तज्ञाची आवश्यकता नाही. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून २२ मार्च,२०२० रोजी जो जनता कर्फ्यु पाळला गेला त्यावेळी जनतेने १०० टक्के प्रतिसाद दिला. त्यानंतरच्या पहील्या टप्यात (२४ मार्च ते १४ एप्रिल) हा प्रतिसाद न कळत कमी झाला. दुसऱ्या टप्यात (१५ एप्रिल ते ३ मे) हा आणखी कमी झाला. तिसऱ्या टप्यात (४ मे ते १७ मे) लोकांचा यास विरोध होऊ लागला आहे. त्यामुळे यापुढे लॉकडाउन चालु ठेवणे कठीण जाणार आहे. त्यामुळे कमीतकमी लोकसंचारासह व्यवहार पुन्हा कसे सुरू करता येतील याचा शोध घेणे आवश्यक आहे. यासाठी गडहिंग्लज शहराचा एक उदाहरण म्हणून अभ्यास केला आहे.

यासाठी गडहिंग्लज शहराच्या बाबतची प्राथमिक माहिती ऑनलाइन मिळविली आहे. त्याशिवाय विविध स्थानिक अहवालातून मिळालेल्या आकडेवारीचा वापर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे प्रातिनिधीक स्वरूपात विविध संबंधित घटकांशी औपचारीक अनौपचारीक चर्चा केली आहे. त्याआधारे सदरचा पेपर तयार केला आहे.

**विषय:**

गडहिंग्लज सुमारे ४० हजार लोकसंख्या असणारे शहर आहे. प्रांत कार्यालय, पोलीस उपअधिक्षक कार्यालय, शासकीय जिल्हा उप रूग्णालय यांच्यासह विविध खात्यांची कार्यालये



GADHINGLAJ ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg. No. 2/12883 Estd. June - 1998 Tal. Gadhinglaj Dist. Kolhapur

वेळ ७ तासापुरती मर्यादीत ठेवावी. हेच प्रारूप इतर कमी आवश्यक सेवा देणाऱ्या दुकानदारांनी वापरावे. परंतु वेळ व दिवस निवडण्याचे स्वातंत्र्य व्यापाऱ्यांना द्यावे.

४. इतर प्रकारची दुकाने किंवा विक्रेते— लॉजींगस, दुध डेअरी, दळप कांडप गिरणी या सारख्या व्यवसायांना गर्दी न करता दररोज व्यवसाय करण्याची मुभा दिली पाहिजे.

५. शहरातील रिक्षा व लहान टेंपो धारक यांना ऑड इव्हन फॉर्म्युला वापरल्यास गर्दी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

६. शहरातील खजगी वाहन धारक (चार चाकी व दोन चाकी) यांना ऑड इव्हन फॉर्म्युला वापरल्यास गर्दी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे, अर्थात आवश्यक सेवा देणाऱ्यांना असे बंधन असु नये. आनिवार्य प्रसंगासाठी २५—५० रू नाममात्र शुल्क भरून इतरांना आपले वाहन वापरण्याची मुभा द्यावी.

वरील प्रारूपाचा अवलंब केल्यास बाजारातील गर्दी स्वाभाविकपणे अधिक तुरळक राहण्यास मदत होईल. वेळेचे बंधन काढुन टाकण्यात यावे आणि पुर्वीप्रमाणे १२ तास दुकाने उघडी राहील्यास कोणतीही अडचण येणार नाही. वरील प्रारूपामध्ये स्थानिक नगरपालीका व व्यापारी प्रतिनिधी यांच्याकडून आवश्यकतेनुसार बदल करून पुर्वीप्रमाणेच व्यवहार पुन्हा सुरू करता येतील व संसर्गाचा धोका कमी राहील. या शिवाय बाजारात स्पीकरच्या माध्यमातुन लोकांचे प्रबोधन करावे लागेल व वारंवार सुचना द्याव्या लागतील. प्रबोधन करून बाजारात येण्याची वारंवारीता कमी करण्यास आवाहन करावे. कमीत कमी काळासाठी लोकांनी घराबाहेर राहण्याचे महत्व सांगावे लागेल. सर्व प्रकारच्या गर्दी होणाऱ्या कार्यक्रमांवर बंधने घालावी लागतील.

**समारोप:**

आपण जागतिकीकरणाच्या या युगात केवळ धावत होतो. त्या धावण्याच्या गतीला असा ब्रेक लागेल अशी कुण्या कविने देखील कधी कल्पना केली नव्हती. असो, परंतु या संकटाने मानवी समाजाला विशेषत: महासत्तांना समज दिली आहे असे आपण समजूया. 'जगा आणि जगू द्या' हे मानवी समाजाचे तत्वज्ञान आत्मसात करूया. वरील प्रारूप जरी खुप आदर्श वाटत असले तरी अव्यवहार्य निश्चीतच नाही. थोडा आर्थिक चटका सर्व संबधीत घटकांना बसणार आहे. परंतू ैवउमजीपदह पे इमजजमत जींद छवजीपदहश हे लक्षात ठेवले पाहिजे. उद्योजक श्री. नारायणमुर्ती व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सारख्या अभ्यासु लोकांनी कोराना सोबत जगण्याचा संदेश आपणास दिला आहे. त्यामुळे प्रत्येक घटकाला कमी जास्त त्रास सोसावा लागेल. अन्यथा गर्दीचे महाभयंकर परीणाम भोगावे लागतील.

**संदर्भसूची:**

१. मार्च, एप्रिल, मे २०२० मधील शासनाचे कोव्हीड —१९ बाबतचे विविध जी. आर. / निर्णय

2- https://www.mygov.in/covid-19-May2020

३. https://static.mygov.in/rest/s3fs-public/mygov_15883406691.pdf-May2020

४. नगरपालिका गडहिंग्लज, व इतर स्थानिक संस्थांचे अहवाल.२०१९

५. भणगे रविंद्र, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लीकेशन्स, अमरावती

६. दै. सकाळ, दै. लोकमत, दै. पुढारी मे २०२० मधील इ—आवृती

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ Reg.No 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj Dist.Kolhapur.